पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/९/कावि/९०८/२००९
दिनांक - १५.१०.२००९

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक २०.१०.२००९ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २०.१०.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रतः- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक- १३७

दिनांक- २०.१०.२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक २०.१०.२००९ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक- १) ड प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील घंटागाडी ठेकेदार खर्च या लेखाशिर्षावर सन २००२-२००३ मध्ये र.रु.३०,०२,२७०/- इतका खर्च झाल्याने जादा झालेल्या र.रु.२२७०/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- २) ड प्रभाग कार्यालयाकडील आरोग्य विभागाकडील नि.नो. क्र.५/१९९९-२००० अ.क्र.११ अन्वये, ड प्रभाग कार्यक्षेत्रातील औष्णीक धुरीकरण करणेबाबत पिकअप व्हॅन/टेंपो पुरविणेकामी मे.नितीन सुधाकर सुर्यवंशी [प्रतिदिन र.रु.२६०/-] या ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने र.रु.७१,४००/- चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ३) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१४.९.२००९ ते दि.२०.९.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१६८/२००९ दि.८.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक - ४) प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२१.९.२००९ ते दि.२७.९.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१६९/२००९ दि.८.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक - ५)

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२८.९.२००९ ते दि.४.१०.२००९ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/१७०/२००९ दि.८.१०.२००९ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्रमांक - ६) मोकाट व भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित ठेवणेकामी केंद्र शासनाकडील असाधारन राजपत्र क्र.९२९ दि.२४ डिसेंबर २००१ चे मार्गदर्शक सुचनानुसार महापालिका हद्दीतील मोकाट कुत्र्यांवर संतती नियमन शस्त्रक्रिया कामकाजाकरीता या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्याने One Day Release पद्धतीने उपक्रम राबविणेकामी मे.पशु कल्याण मंडळ, परभणी यांना याकामी र.रु.३८५/- प्रति शस्त्रक्रिया (कुत्रा पकडणे, कुत्र्यांचे तक्रारीचे निवारण करणे, शस्त्रक्रिया शुल्क, औषधे, शस्त्रक्रिया साहित्य व इतर आवश्यक खर्चासह) इतके शुल्क अदा करणेस व मे.पशु कल्याण मंडळ,परभणी यांचेशी आवश्यक करारनामा करणेस व याकामी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ७) ड प्रभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रामधील वॉर्ड क्र. ९४,९५,९६, ९७,९८ व ८० मधील घरोघरचा कचरा खाजगी रिक्षा टेम्पोमार्फत गोळा करणेकामी प्रस्तावात नमुद एकुण ८ रिक्षा टेम्पो माहे जुलै २००९ पासुन वाहनचालक,इंधन व दोन मजुर कर्मचाऱ्यांसह प्रतिदिन र.रु.७००/- प्रमाणे माहे डिसेंबर २००९ पर्यंत येणारा अपेक्षित खर्च र.रु.१०,२४,८००/- असल्याने रिक्षाटेम्पोधारक यांच्याकडून प्रतिदिन प्रति टेम्पो र.रु.७००/- या दराने मनपाचे छोटी वाहने उपलब्ध होईपर्यंत काम करुन घेण्यास व येणाऱ्या खर्च रकमेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ८) शासनाकडून वाहनचालक पदे मंजूर होईपर्यंत वाहनचालकांची आवश्यकता विचारात घेऊन प्रस्तावात नमूद एकुण ३७ कर्मचाऱ्यांना त्यांचे नावापुढे स्तंभ ५ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून आणखी ६ महिने कालावधीसाठी र.रु.८,०००/- दरमहा एकत्रित मानधनावर नियुक्ती देणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ९) श्री.पांडुरंग निवृत्ती वेताळ,कचराकुली यांच्यावर खातेनिहाय चौकशीमध्ये सिद्ध झालेले दोषारोप,अंतिम नोटीसचा त्यांचा खुलासा व चौकशीनंतरही त्यांची मोठ्या प्रमाणातील गैरहजेरी यानुसार श्री.वेताळ यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने त्यांना सेवेतून काढून टाकण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - १०) भारत सरकार मंत्रालय हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर ऑफिस मेमोरेण्डम क (B-12014/7192-CGHSCP) दिनांक:-३१/१२/१९९३ भारत सरकार मंत्रालय हेल्थ ॲण्ड फॅमिली वेलफेअर कडील दिनांक:-१७/९/१९९९ चे दुरुस्ती अन्वये कर्मचाऱ्यांवर अवलंबुन असणाऱ्या अविवाहीत मुलाचे वय २५ वर्षे व जो मुलगा अपंग (Physicaly व Mental) असेल त्यांचेबाबतीत वयाची अट शिथिल करुन सी.जी.एच.एस. मध्ये सुविधा उपलब्ध असल्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी व अधिकारी व शिक्षण मंडळ कर्मचारी व अधिकारी यांच्या अपंग पाल्यास (Physicaly व Mental) वैद्यकीय सुविधा व बिलाची प्रतिपुर्ती करुन देण्यात अडचण निर्माण होवु नये म्हणुन कर्मचाऱ्याचा पाल्य अपंग असेल (Physicaly व Mental) तो पुर्णपणे कर्मचाऱ्यावर आर्थिकदृष्ट्या अवलंबुन असेल याबाबत योग्य ते पुरावे सादर केले तर त्यास मनपा दवाखान्यात/रुग्णालयात मोफत उपचार सोईसुविधा तसेच नियमानुसार देय इतर बिलाची प्रतिपुर्ती करुन देण्याबाबतचे धोरण निश्चित करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक - ११) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत चालू असणाऱ्या Online System (E-tendering) करिता Security Testing and Certification करणेचे कामकाज तातडीने करणे आवश्यक असल्याने निविदा न मागविता,करारनामा न करता, थेट पद्धतीने केंद्र शासनाचे STQC या संस्थेमार्फत करणेत येणार असल्याने सदर कामकाजासाठी येणाऱ्या र.रु.२,२०,६००/- (Including Service Tax १०.३%) खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/९०८/२००९
दिनांक : १५/१०/२००९ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.